Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

# सावित्रीबाई फुले आणि रूढीवाद

**सुवर्णा देविदास बुरहाण**
लोकमान्य टिळक महाविद्यालय,
वनी, जिल्हा यवतमाळ
suwarna77burhan@gmail.com
Mob. No-7447842923

**सारांश :-**

भारतीय समाजातील आजची स्थिती पाहाता रूढीवादाची पाळेमुळे फार खोलवर रूजलेली दिसतात. स्त्रिया मग त्या अशिक्षित, ग्रामिण, कामगार वर्गीय असोत किंवा उच्च विद्याविभूषित, नोकरीपेशा शहरी असोत त्या कर्मकांड अंधश्रद्धा यात गुरफटलेल्या दिसतात, या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुलेंनी केलेले कार्य, रूढीवादावर केलेला प्रहार, प्रासंगिक वाटतो, त्यांनी जुनाट रूढींवर आपल्या विचार आणि कार्यातून जोरदार हल्ले केले. स्त्री जागृतीसाठी अंधश्रद्धा व जुनाट रूढी यांच्या गुलामीतून मुक्त करण्याचा चंग बांधला आणि स्त्रियांना मानसिक खच्चिकरणापासून वाचविले, त्यांचे वैचारिक उदात्तीकरण घडवून आणले.

*** प्रमुख शब्द :-**

रूढीवाद, कर्मकांड, अंधश्रद्धा, स्त्री - जागृती. गुलामी, मानसिक खच्चिकरण, वैचारिक उदात्तीकरण वैदिक कालखंडापासून तर 18, 19 व्या शतकापर्यंत स्त्री - शिक्षणाचा आढावा घेतल्यास काही निवडक उच्चवर्णिय स्त्रियांव्यतिरिक्त बहुजन समाजातील कोणत्याही स्त्रिला शिक्षण मिळाल्याची उदाहरणे क्वचित सापडतील, वैदिक व्यवस्थेनुसार शूद्रांना शिक्षणांची दारे कायम बंद होती, स्त्री ही अवर्ण असल्यामुळे तिला शिक्षण मिळण्याचा मार्गच बंद होता असे म्हणता येईल.

भारतीय समाजव्यवस्थेमध्ये रूढीवादाची मूळे आजही खोलवर रूजलेली दिसतात. याचे मूळ नक्कीच जातिवादामध्ये आहे असे दिसते जातींच्या उतरंडीने एका माणसाला दुस-यापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ ठरविले, श्रेष्ठांनी कनिष्ठांवर अनेक बाबी लादल्या, त्याच कालांतराने रूढींच्या रूपात समोर आल्यात, यामध्ये सर्वात जास्त हानी जर कोणाची झाली असेल तर ती स्त्रियांची झालेली आहे, असे निदर्शनास येते, म्हणूनच स्त्रियांची अवस्था ही दुहेरी गुलामीची दिसते. त्या समाजव्यवस्थेच्या गुलाम तर असतातच सोबतच आपल्या पतीच्याही गुलाम असतात.

भारतातील पुरूषसत्ताक व्यवस्थेने स्त्रिला माणूस कधी मानलेच नाही. तिचा दर्जा कायम पुरूषांच्या खालचाच राहिला. आज 21 व्या शतकात स्त्री जरी शिकली. मोठमोठ्या पदांवर पोहोचली, पुरूषांच्या बरोबरीने काम करत असली तरी देखिल तिचा दर्जा कुटुंबात, समाजात सगळीकडे दुय्यमच आहे असे दिसते, अभ्यासा दरम्यान हे लक्षात आले की, उच्चवर्णिय कनिष्ठवर्णियांवर सत्ता गाजवतात, त्याचे शल्य, राग हे कनिष्ठवर्णिय कुटुंबातील स्त्रीवर सत्ता गाजवून काढतात असे दिसते.

वैदिक कालखंडापासून 19 व्या शकतापर्यंतचा इतिहासाचा प्रवास बघता भारतामध्ये अनेक घटकांवर अनेक बंधने, अनिष्ठ चालीरीती, रूढी, प्रथा, परंपरा आठळून येतात. या सर्वांना केरकचरा ठरविण्याचे धैर्य ज्योतिराव फुलेंच्या मूशीतनू तयार झालेल्या एका अद्वितीय व्यक्तिमत्त्वाच्या धनी, दृष्टम स्त्रिने म्हणजेच सावित्रीबाई फुले यांनी केले.

19 व्या शतकात बालविवाह, जरठ विवाह, विधवा विवाहास बंदी, केशवपन, स्त्री – शिक्षणाला बंदी, सतीप्रथा, बालहत्या इत्यादि अनेक घातक रूढींना धार्मिक महत्व देऊन विकृत सामाजिक मानसिकतेतून स्त्रियांवर लादल्या गेल्या होत्या यातून स्त्रियांचे मानसिक तथा शारीरिक खच्चिकरण झाले, या सर्वांतून स्त्रियांनी सावरण्याचा मार्ग जर कुणी दाखविला असेल तर तो सावित्रीबाई फुले यांनीच. आम्ही आज ज्या स्थितीला आहोत त्यात सावित्रीबाई फुले यांचा फार मोलाचा वाटा आहे, म्हणूनच आम्ही त्यांच्या शतश: ऋणी आहोत.

सावित्रीबाईंनी अशिक्षा हे स्त्रियांच्या का अधोगतीचे कारण आहे व स्त्री अशिक्षित असल्याने कुटुंबाची व पर्यायाने समाजाची अधोगती होत आहे हे ओळखून सर्वप्रथम शैक्षणिक कार्यास सुरूवात केली. पण एवढ्यावरच त्या थांबल्या नाहीत तर इतर अनेक कार्यात मोठ्या तत्परतेने पुढकार घेतला. त्या स्त्री – पुरूष समानतेच्या प्रणेत्या तसेच स्त्रियांची प्रतिष्ठा वाढविणा-या लोकनेत्या देखील होत्या.

त्यांच्या जातिव्यवस्थेला विरोध असल्याची देखील बरीच उदाहरणे दिसतात, त्यांच्या शाळेत अमूक एका जातीच्या मुलीने प्रवेश घ्यावा असे नव्हते तर ब्राह्मण आणि अब्राह्मण अशा सर्वच जातीतील मुली त्यांच्या शाळेत शिकत होत्या तसेच दुसरे उदाहरण त्यांनी एका ब्राह्मण विधवेचा मुलगा दत्तक घेऊन यशवंत नाव ठेवले व तोच मुलगा पुढे मिलिटर्स मध्ये डॉक्टर झाला व प्लेगच्या साथीमध्ये डॉ. यशवंत ज्योतिबा फुले यांनी समाजातील तळागाळातील लोकांची सेवा करून सावित्री – ज्योतिबा यांचे नाव मोठे केले.

त्या काळात बालविवाहांमुळे बालविधवांचे प्रमाण देखील फार वाढले होते, विधवाविवाहावर बंदी होती, ह्या मुली संसार काय असतो हे समजण्या आधीच विधवा व्हायच्या, वयात आल्यानंतर त्यांच्या भावनांवर नियंत्रण ठेवणे त्यांना कठीण व्हायचे त्याचाच फायदा समाजातील काही घटक घेत असत. त्यातून त्यांना अपत्य प्राप्ती झाली तर त्याचा स्विकार मात्र कुणी करत नसत तेव्हा सावित्रीबाईंनी अशा अडचणींतील स्त्रियांची आई बनुण त्यांचे सर्व कार्य पार पाडून तसेच बालहत्या प्रतिबंधक गृहाची स्थापना करून त्या बालकांना जीवदान दिले. व त्यांचा सांभाळ मायेने केला. एका विधवा स्त्रिचा पुनरविवाह घडवून आणला.

विधवा स्त्रियांसाठी अतिशय अपमानजनक अशी पद्धत म्हणजे केशवपन, त्यांच सौंदार्य कमी करून त्यांना घरात डांबून ठेवण्याच्या ह्या प्रकारात सावित्रीबाईंनी पुढकार घेऊन नाव्यांचे बौद्धिक घेऊन, त्यांना प्रबोधित करून नाव्यांचा संप घडवून आणला अशाप्रकारे केशवपनाच्या अपमानजनक कार्यास विरोध दर्शविला.

दलित - पिडित समाजाला शतकानुशतके अस्पृश्य ठरवून मुख्य समाजापासून दूर ठेवण्यात आले होते. त्यांना पिण्याच्या पाण्यासाठी स्वत:च्या घरातील हौद या फुले दांपत्यानी इ.स. 1876-77 च्या दुष्काळात मिळेल तिथून अन्न गोळा करून 52 अलग छात्रालये चालविली. हजारो लोकांना अन्न मिळू लागले.

महिलांना अंधश्रद्धा व जुनार गुलामगिरीतनू मुक्त करण्यासाठी सावित्रीबाईंनी आटोकाट प्रयत्न केले व महिला सेवा मंडळांची स्थापना केली. त्याद्वारे स्त्री जागृतीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करून स्त्री मुक्ति आंदोलन उभारणे. परंतु आज स्त्रियांची स्थिती काही वेगळीच दिसते.

सावित्रीबाईंनी शिक्षणाच्या सर्वोत्तम मार्ग दाखविला आज आम्ही उच्चशिक्षित आहोत. अगदी प्रधानमंत्री, राष्ट्रपती सारखी सन्माननीय पद भूषवित आहोत. आम्हाला वाटतंबी आम्ही स्वतंत्र विचारांच्या आहोत, राहत्या वागण्याचं, पेहरावाचं, बोलण्याचं, शिकण्याच स्वातंत्र्य आम्हाला आहे, परंतु विचार केल्यावर लक्षात येतं की, आम्ही तर

अजूनही अंधश्रद्धा आणि जुनाट रूढींच्या गुलाम आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे की, ''गुलाम माता गुलामांना जन्म देते'' अगदी तसेच आम्ही उच्चशिक्षित वैचारिक गुलाम स्त्रियां वैचारिक 'गुलाम पीढी निर्माण करीत आहोत.

पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या रूढींना आम्ही इतके चिकटलो आहोत की, रूढी –परंपरा सांभाळण्याचा जबाबदारी कुटुंबातील स्त्रियांलाच का टाकली गेली यावर विचारमंथन करण्याची गरज सुद्धा आम्हाला वाटत नाही; त्यामुळे रूढी-परंपरांच्या माध्यमातून आमच्याच गुलामी लादली गेली; स्वतंत्र विचार करण्याचा अधिकार हिसकावून घेतला गेला हे देखील आमच्या लक्षात येत नाही. उलट देव – धर्म, कर्मकांड करण्यात आम्ही धन्याचा मानतो वेगवेगळया देवाला जाने नवस करणे, लोटांगण घालने उपवास करणे इत्यादी अनेक प्रकार उच्चशिक्षितांमध्ये दिसतात, रूढी प्रथा परंपरांना, अंधश्रद्धांना अशिक्षितांपेक्षा उच्चशिक्षित जास्त खतपाणी घालतांना दिसतात. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाईंनी केलेले बंड प्रासंगिक वाटते.

**ग्रंथसूची :**


- कुलकणी, पी.के. (२००६): समाजशास्त्रातील सैध्दांतीक दृष्टीकोन, मंगेश प्रकाशन, नागपुर
- काचोळे, दा. धो. (१९९५): ग्रामीण समाजशास्त्र, कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
- कर्वे, स्वाती (२००३): स्त्री विकासाच्या पाऊलखाणा, प्रतिमा प्रकाशन, पुणे.
- गोटे, शुभांगी (२००४): महिला सबलीकरण- स्वरुप व समस्या, वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद.
- गोऱ्हे, निलम (१९९७): नारी पर्व, श्री विद्या प्रकाशन, पुणे.
- गुप्ता, कमलेशकुमार (२००५): महिला सशक्तिकरण, बुक एनक्लेव, जयपुर.
- नाडगोंडे, गुरुनाथ (१९९९): सामाजिक संशोधन पध्दती, फडके प्रकाशन, कोल्हापुर
- साखरे, सीमा (१९९५): स्त्रीवाद, सीमा प्रकाशन, नागपुर.